।। विद्या विनयेन शोभते ।।
SHETH T. J. EDUCATION SOCIETY'S
SHETH NANJIBHAI KHIMJIBHAI THAKKAR THANAWALA COLLEGE OF COMMERCE &
SHETH JAYANTILAL TRIBHOVANDAS THANAWALA COLLEGE OF ARTS
Kharkar Ali, Thane (W) - 400 601
A Linguistic Minority Institute, Recognized under 2(f) and 12(b) of the UGC act 1956
Tel.: 25431119, Website : www.nktdegreecollege.org Email:- nkttdg@yahoo.co.in
Re-Accredited by NAAC with CGPA 2.62, B+ Grade (3rd Cycle)

LEARNING RESOURCE CENTRE [LIBRARY]

## BOOK EXHIBITION-DNYANESHWARI JAYANTI@16TH SEPTEMBER






# श्रीज्ञानेश्वरी जयंती

आज भाद्रपद कृष्ण षष्ठी, आजच्या तिथीला 'श्रीज्ञानेश्वरी जयंती' म्हणतात. अर्थात् ही श्रीज्ञानेश्वरीच्या निर्मितीची तिथी नाही, श्रीसंत एकनाथ महाराजांनी केलेल्या श्रीज्ञानेश्वरीच्या प्रतिशुद्धीच्या कार्याची ही तिथी आहे. जवळपास तीनशे वर्षांमधील पाठांतरांमुळे मूळ श्रीज्ञानेश्वरीच्या पाठात ज्या अशुद्धी निर्माण झाल्या, चुकीचे पाठ रूढ होत गेले, ते सद्गुरु श्री माउलींच्या आज्ञेनुसार श्रीसंत एकनाथ महाराजांनी प्रयत्नपूर्वक काढून टाकून श्रीज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत पुन्हा तयार केली. ती त्यांची लेखनकामाठी आजच्या तिथीला पूर्ण झाली होती.

सद्गुरु श्री माउलींचेच स्वरूप असणाऱ्या श्रीज्ञानेश्वरीचे माहात्म्य सांगताना श्रीसंत जनाबाई म्हणतात,

वाचावी ज्ञानेश्वरी, डोळां पहावी पंढरी ॥१॥ ज्ञान होये अज्ञान्यांसी, ऐसा वर त्या टीकेसी ॥२॥

ज्ञान होये सकळा मूढां, अतिमूर्ख त्या दगडां ॥३॥ वाचेल जो कोणी, जनी त्यासी लोटांगणी ॥४॥

आजच्या पावन तिथीला सद्गुरु भगवान श्री ज्ञानेश्वर माउलींचेच अपरस्वरूप असणाऱ्या माय माहेश्वरी श्रीज्ञानदेवीला आपण सर्वभावे शरण जाऊन दंडवत घालू या आणि आजन्म तिची सेवा करून या दुर्लभ अशा मानवी आयुष्यात धन्य धन्य होऊ या !

ज्ञानेश्वरी माउली माय । एक पुस्तकी ग्रंथालय । ब्रह्मसाम्राज्य निलय । मामा म्हणती ॥

भगवती श्रीज्ञानदेवीच्या श्रीचरणीं सादर साष्टांग दंडवत !!

| | |
|---|---|
|   | अधिक वाचनासाठी खालील लिंकवर क्लिक करा<br>TO READ ONLINE, PLEASE CLICK ON THE LINK<br>https://marathicorner.com/dnyaneshwariin-marathi.html |

**ALL ARE REQUESTED TO VIEW OUR LIBRARY COLLECTION**

**Vision:- Committed and Persuasive efforts towards Holistic Education.**